**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५२/२०२३**

विठ्ठल व ईतर वि. लक्ष्मीबाई

MHJN100006232023

## निशाणी क्र. १४ खालील आदेश

**(पारित दिनांक १०/१२/२०२५)**

०१. प्रस्तुतचा अर्ज लेखी जवाब नाहीचा आदेश बाजुला सारणेकरिता गैरअर्जदार यांनी दाखल केलेला आहे.

०२. गैरअर्जदार यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार ही हजर झाल्यानंतर प्रकरण लेखी जवाबासाठी ठेवण्यात आलेले होते. गैरअर्जदार आजारी असल्याने न्यायालयासमक्ष हजर होवून तिचा लेखी दाखल करु शकली नाही. त्यामुळे मा. न्यायालयाने दि. ०३/०४/२०२४ गैरअर्जदाराविरुध्द लेखी जवाब नाही चा आदेश पारीत केलेला आहे. गैरअर्जदार यांनी हेतुपुरस्सर किंवा जाणुनबुजून पुरावा देण्याचे टाळलेले नाही. त्यामुळे झालेला विलंब क्षमापीत करण्याच्या पात्रतेचा असुन गैरअर्जदारास तीचा लेखी जवाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी म्हणने दाखल करुन घेण्याची विनंती केली. त्यामुळे गैरअर्जदाराच्या विरोधात पारीत झालेला लेखी जवाब नाही चा आदेश रद्द होवुन तीचे लेखी म्हणने स्वीकारण्यात यावे, अशी विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

०३. अर्जदारांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन गैरअर्जदाराच्या अर्जास तिव्र आक्षेप घेतला व कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदाराने कोणतेच संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. तसेच कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. करीता सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती अर्जदारांनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वरील विवेचनावरुन दिसून येते की, गैरअर्जदार हया आजारी असल्यामुळे त्यांचे लेखी म्हणने मुदतीत दाखल करु शकले नाहीत. तसेच मूळ अर्जातील वादविषय पाहता व प्रस्तुत अर्ज हा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी तसेच गुणदोषावर निकाल होणेकरिता गैरअर्जदार यांचा लेखी जवाब पटलावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, गैरअर्जदार यांच्या विरुध्दचा लेखी जवाब नाहीचा आदेश दंड आकारुन बाजुला सारणे उचित होणार आहे, असे माझे मत झाले आहे. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. सदरचा अर्ज रक्कम २००/- दंड आकारुन मंजुर करण्यात येतो.

२. सदरची दंडाची रक्कम गैरअर्जदार यांनी अर्जदारास अदा करावी.

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2025.12.10 13:01:45 +0530

ठिकाण- मंठा
दिनांक- १०/१२/२०२५

(श्रीमती एल.पी. धन्वे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मंठा.